## एसएनडीटी महिला विद्यापीठात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**मुंबई** : श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,( एसएनडीटी ) चर्चगेट,मुंबई येथे ७३ वा प्रजासत्ताक दिन उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.सकाळी ठीक आठ वाजून पाच मिनिटांनी कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. संजय शेडमाके, विद्यार्थी कल्याण मंडळाचे सहायक अधिष्ठाता डॉ. नितीन प्रभुतेंडुलकर मंचावर उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थिनींनी दिमाखदार पथसंचलन सादर करीत उपस्थितांचे लक्ष वेधले. प्रास्ताविक डॉ. संजय शेडमाके यांनी केले.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी सर्व उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि विद्यापीठाच्या पुढील वाटचाली मध्ये सर्वांनी सक्रिय सहभाग घेणेबाबत मार्गदर्शन केले. सोबतच कुलगुरू डॉ.उज्वला चक्रदेव यांनी संविधान उद्देशिका चे वाचन केले. कार्यक्रमात विद्यापीठाच्या बॉक्सिंग व सांस्कृतिक क्षेत्रात कार्य केलेल्या विद्यार्थिनींचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कोविड नियमांमुळे प्रत्यक्ष उपस्थित न राहणाऱ्या सर्वांसाठी आभासी माध्यमाचा उपयोग करण्यात आला.

या कार्यक्रमास विद्यापीठाच्या चर्चगेट व जुहू आवारातील शिक्षकेतर अधिकारी, विविध विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कोविड -19 च्या पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करुन प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थी कल्याण मंडळाचे सहायक अधिष्ठाता डॉ. नितीन प्रभुतेंडुलकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



**फोटो :- एसएनडीटी महिला विद्यापीठ,चर्चगेट आवार, मुंबई येथे कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. संजय शेडमाके उपस्थित होते.**

---------------------------------------------------------------------------------------------------------

**पुणे :** श्रीमती ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या पुणे परिसर येथे ७३ वा प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा झाला. सकाळी ७.३० वा कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्र-कुलगुरू प्रा. रूबी ओझा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संगीत विंभागाच्या विद्यार्थीनीनी राष्ट्रगीत, विद्यापीठगीत व देशभक्तीपरगीत सादर केले. प्र-कुलगुरू यांनी संविधान उद्धेशीकेचे वाचन केले आणि सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थीनींनी दिमाखदार संचलन केले.

प्रजासत्ताक दिना निमित्त घेण्यात आलेल्या फोटोग्राफी स्पर्धेचा निकाल जाहिर करून विजेत्यांना बक्षिस वितरण करण्यात आलें. तसेच निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी पदव्युत्तर विभागाचे समन्वयक प्रा.डॉ. सुभाष पाटील, बी.एड्. कॉलेजच्या प्राचार्या आणि मॅनेजमेंट कौन्सिल मेंबर प्रा. डॉ. नलिनी पाटील तसेच डॉ. माधवी कुलकर्णी, डॉ. वासंती जोशी व डॉ. वैशंपायन उपस्थित होते. कार्यक्रमासाठी विविध विभाग प्रमुख, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ विदुला आडकर यांनी केले. पुणे परिसर समन्वयक डॉ. शितल मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले व चहापानाने कार्यक्रमाची सांगतां झाली.



**फोटो :- एसएनडीटी महिला विद्यापीठ,पुणे आवार येथे प्र-कुलगुरू प्रा. रूबी ओझा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

**श्रीवर्धन :** श्रीमती ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या श्रीवर्धन आवारामध्ये ७३ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलसचिव डॉ. सुभाष वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कोरोनाच्या शासनाने दिलेल्या सर्व नियमांचे पालन करून आयटीआय श्रीवर्धन येथील पटांगणामध्ये हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आयटीआय कॉलेज चे प्राचार्य प्रामुख्याने उपस्थित होते.महर्षी कर्वे मॉडेल कॉलेजचे समन्वयक अनिल वाणी व आवारातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.



**फोटो :- एसएनडीटी महिला विद्यापीठ,श्रीवर्धन आवार येथे कुलसचिव डॉ. सुभाष वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------